शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १२४ वा | शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आता एकत्रच होणार निवडणुका !

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## वन नेशन-वन इलेक्शन विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर आज (दि. १२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास 'एक देश, एक




निवडणूक' धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्वासनाचा समावेश होता. शिवाय, 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

### नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू अनुकूल

'रालोआ' सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. 'एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे', असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संप्टेबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

## साडेतीन हजारावर गेलेला कांद्याचा सरासरी भाव आता तीन हजारांवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कृषी उत्पन्न बाजार समितीत साडेतीन हजारावर गेलेला कांद्याचा सरासरी भाव आता तीन हजार रुपयांवर आला आहे. बुधवारी सोलापूर बाजार समितीत ४२४ गाड्या कांदा आवक झाली होती.

त्यातील पाच क्विंटल कांद्याला सहा हजार ३०० रुपयांचा भाव मिळाला. तर ३२ क्विंटल कांद्याला अवघा ५०० रुपयांचा दर मिळाल्याचे पाहायला मिळाले.

सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटक, बीड, धाराशिव, नाशिक, पुणे येथून



सोलापूर बाजार समितीत कांदा येत आहे. निर्यात सुरु असल्याने यंदा कांद्याला समाधानकारक दर मिळत आहे, पण तो देखील शेतकऱ्यांना चार पैसे राहतील असा नाही ही वस्तुस्थिती आहे. बुधवारी सोलापूर बाजार समितीत ४२४ गाड्या कांदा आला होता. एकूण ८४ हजार ८७० पिशव्या कांद्यापैकी ४२ हजार ३९८ क्विंटल कांद्याला सरासरी तीन हजार रुपयांचा भाव मिळाला.

बंगळूर बाजारात प्रतिक्विंटल चार ते साडेचार हजार रुपयांपर्यंत दर होता. आता जानेवारीत कांद्याची आवक वाढेल, पण दर स्थिर राहतील असा विश्वास व्यापाऱ्यांना आहे. पावसाळ्यात सुरवातीला लावलेला कांदा खराब झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पुन्हा नव्याने कांदा लागवड केली आहे. तो कांदा आता जानेवारीत बाजारात येईल.

## बेकायदेशीर कत्तलीसाठी जनावरे घेऊन निघालेला टेम्पो मोहोळ पोलीसांनी पकडला

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** कत्तलीसाठी दीड लाख रुपयाची बेकायदेशीर जनावरे घेऊन जाणारा आयशर टेम्पो पोलिसांनी व गोरक्षक पथकाने पकडला व जनावरांची गोशाळेत रवानगी केली. या प्रकरणी टेम्पो चालका विरोधात मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

हा प्रकार मोहोळ ते वैराग मार्गावरील नरखेड येथील चार रस्ता चौकात गुरूवारी दुपारी 3 वाजता घडला. दरम्यान टेम्पो चालक पळून जाण्यात यशस्वी झाला. मोहोळ पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार, गुरुवारी दुपारी 3 वाजण्याच्या सुमारास आयशर टेम्पो क्रमांक एमएच 04 डी के 3239



हा मोहोळ होऊन वैरागच्या दिशेने निघाला होता.

सदरचा टेम्पो नरखेड येथील चार रस्ता चौकात आला असता संशय आल्याने गोरक्षक पथक व नरखेड पोलिसांनी हा टेम्पो आडविला. त्यात पाहिले असता, लहान मोठी एकूण 18 जनावरे दाटीवाटीने व पाय बांधलेल्या अवस्थेत आढळून आली. तसेच त्यांच्या चाऱ्या पाण्याची कुठलीही सोय केली नव्हती.

दरम्यान ही जनावरे अहिंसा गोशाळा सोलापूर येथे दाखल करण्यात आली. या प्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल धनाजी घोरपडे यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दिली असून, तपास अंमलदार समाधान पाटील करीत आहेत.

## सोलापूरमध्ये एम्स रुग्णालय उभा करा, राज्य सरकार मदत करेल

### खा. प्रणिती शिंदे यांचे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूरच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सोलापूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) उभारण्यासाठी त्यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांना पत्र पाठवून मागणी केली आहे. प्रणिती शिंदे या खासदार झाल्यापासून सोलापूरच्या विविध विकास प्रकल्पांवर सातत्याने लक्ष केंद्रित करत आहेत. ज्यात विमानतळ विकास, रेल्वे सुविधांचा विस्तार, युवकांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांचा विज, पाणी, हमीभाव या सारख्या प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दिल्ली दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे. त्याचप्रमाणे आता त्यांनी सोलापूरसाठी एम्सची मागणी केली आहे.



खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री नड्डा यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सोलापूरची भौगोलिक स्थिती आणि लोकसंख्या पाहता सोलापूर जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्यातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळणे गरजेचे आहे. यासाठी सोलापूरमध्ये एम्स सारख्या अद्ययावत रुग्णालयाची आवश्यकता आहे. सोलापूर हा पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या एक महत्त्वाचा जिल्हा मानला जातो. सोलापूर शहरात लोकसंख्येची घनता अधिक आहे. शिवाय ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विविध आजारांवर उपचार करण्यासाठी नागरिकांना शहरात धाव घ्यावी लागते. या पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये एम्सची स्थापना होणे एक गरजेची बाब असून त्याचा लाखो रुग्णांना फायदा होणार असल्याचे शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

आरोग्य सेवांच्या उभारणीसाठी एम्ससारख्या अत्याधुनिक रुग्णालयाची आवश्यकता असल्यामुळे शिंदे यांनी संसदेत सोलापूरसाठी ही मागणी उपस्थित केली आहे. सोलापूरच्या आरोग्य व्यवस्थेची सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध होण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच महाराष्ट्र सरकारने सोलापूरमध्ये एम्स उभे राहण्यासाठी मदत करण्यास तयार आहे. त्यामुळे सोलापूर हे एम्स प्रकल्पासाठी योग्य ठिकाण ठरेल, असेही शिंदे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान, मागील दहा वर्षांत सोलापूरचे विकास कामे बऱ्याच प्रमाणात रखडले होती. भाजपच्या खासदारांकडून सोलापूरच्या विकासासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत, असा आरोप होत आहे. मात्र, प्रणिती शिंदे यांनी खासदार पद मिळाल्यापासून सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे सोलापूरच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. त्याप्रमाणेच एम्स रुग्णालयाच्या खासदार शिंदे यांनी केलेल्या मागणीवर केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा सोलापूरकरांनी व्यक्त केली आहे.

## मंत्रिमंडळ विस्ताराची तारीख अन वेळ ठरली

### ३५ आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मंत्रिमंडळ विस्ताराच्या तारखेवर अखेर शिक्कामोर्तब झालेय. १४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता राजभवनात मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ३५ आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. मंत्रिमंडळ विस्तारात अजित पवार यांना झुकते माप दिल्याचे सूत्रांनी सांगितलेय. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, २०-१०-१० असा महायुतीचा फॉम्युर्ला ठरल्याचे समजतेय.

**भाजपचाच वरचष्मा**

हिवाळी अधिवेशनाच्या आधी मंत्रिमंडळ विस्तार पार पडणार आहे. भाजपचे सर्वात जास्त आमदार असल्यामुळे वर्चचष्मा त्यांचाच असेल. १४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता तिन्ही पक्षाचे मिळून ३५ मंत्री शपथ घेणार असल्याचे समोर आलेय. मंत्रीमंडळ विस्ताराबाबत भाजपचा वरचष्मा कायम राहणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. भाजपकडे सर्वाधिक २० खाती राहण्याची शक्यता आहे. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना १०-१० खाती मिळणार आहे.

**कुणाकडे कोणतं खातं?**

देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांच्या दिल्लीतील बैठकीत झालेल्या चर्चेतून काही महत्त्वाचे मुद्दे समोर येत आहेत. गृह आणि अर्थ ही महत्त्वाची खाती भाजपकडेच राहतील. नगरविकास शिवसेनेला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वाट्याला महसूल मिळू शकते. भाजपकडून सार्वजनिक बांधकाम खाते इतर गटाला सोपवण्याची तयारी असल्याचे सांगितले जात आहे.

**महायुतीची बैठक, मंत्रिमंडळावर शिक्कामोर्तब होणार**

मंत्रिमंडळ विस्ताराला अंतिम स्वरूप मुंबईतील महायुतीच्या बैठकीनंतर मिळणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आज संध्याकाळी ही बैठक होण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबतच्या अंतिम बैठकीनंतर शिक्कामोर्तब होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे सध्या दिल्लीमध्ये आहेत. देवेंद्र फडणवीस हे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटी घेण्यासाठी दिल्लीला पोहचले आहेत. त्यांनी नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्याआधी बुधवारी त्यांनी अमित शाह आणि जेपी नड्डा यांची भेट घेतली. या भेटीमध्ये महाराष्ट्रातील खातेवाटपावर चर्चा झाली आहे.

## पंढरपूर तालुक्यातील प्रलंबित विकास कामे तातडीने मार्गी लावावीत - आ. समाधान आवताडे



पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यातील मंजूर विकास कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून संबंधित खात्यातील प्रलंबित असलेली विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या.


शेतकी भवन पंचायत समिती पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांच्या उपस्थित तालुक्यातील विविध विकास कामाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव तसेच तालुक्यातील विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

तालुक्यात सुरू असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना, रस्त्यांची कामे, घरकुल योजना, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुसंवर्धन, तीर्थक्षेत्र योजना, नागरी सुविधा, महावितरण, पाटबंधारे आदी विभागांची सखोल माहिती आमदार आवताडे यांनी घेवून कामे वेळेत पूर्ण करावीत अशा सूचना दिल्या. तसेच रांझणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून येत असून सदर कामांची तात्काळ पाहणी करून संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचना आमदार अवताडे यांनी दिल्या. परिवहन विभागाने पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ करावा.

पंढरपूर येथे दररोज येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या विचारात घेता एसटी महामंडळ विभागाने बस स्थानक कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी.महावितरण विभागाने शेतकऱ्यांसाठी मंजूर असलेले रोहित्र तात्काळ बसून कार्यान्वित करावेत. तसेच ग्रामीण भागात मंजूर कामांच्या पूर्ण होण्यात येणाऱ्या अडचणी दूर करून ग्रामस्थ आणि संबंधित अधिकाऱ्यांनी ही कामे वेळेत पूर्ण करावेत व उद्दिष्ट पूर्ण करावे अशा सूचनाही आमदार आवताडे यांनी दिल्या.

यावेळी नगरपालिका, महावितरण, कृषी, आरोग्य, शिक्षण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, परिवहन, एस. टी.महामंडळ, पाटबंधारे आदी विभागाच्या विभाग प्रमुखांनी मंजूर व सुरु असलेल्या कामांची माहिती दिली.

## प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत ॲग्रिस्टॅक योजनेची माहिती पोहोचवावी - जिल्हाधिकारी आशीर्वाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक ही योजना राज्यात राबविण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने या योजनेची माहिती तळागाळातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित ॲग्रिस्टॅक योजनेच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, केंद्रशासन ही योजना राबवत असून राज्य शासनाने ही कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना अधिक जलद सुविधा देण्यासाठी ॲग्रिस्टॅक ही योजना राज्यात राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांची माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) (पान 2 वर..)

## सोलापूर शहर पोलिसांची डायल ११२ यंत्रणा लयभारी; राज्यात ठरली अव्वल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी कोणतीही घटना घडल्यास पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचावेत, यासाठी सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाची डायल-112 (Dial-112 system) ही यंत्रणा नोव्हेंबर महिन्यात राज्यात अव्वल ठरली आहे. दरम्यान, आपत्कालीन प्रतिसाद पथक (डायल-112) सोलापूर शहर यांनी नोव्हेंबर महिन्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता, राजकीय सभा, कायदा व सुव्यवस्थेचा महत्त्वाचा बंदोबस्त, पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच झेड प्लस सुरक्षा असलेल्या व्यक्तींचे महत्त्वाचे बंदोबस्त अशा अनेक पातळीवर मात करीत एक ते 30 नोव्हेंबरपर्यंत एकूण एक हजार 707 नागरिकांकडून डायल 112 या हेल्पलाइनवर पोलिस मदत मागितली, त्यांना पोलिस आयुक्तालाच्या डायल-112 पथकाने कमीत कमी वेळेत सरासरी 37 सेकंदांमध्ये प्रतिसाद देत मदत दिली. संकटग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी सोलापूर शहर पोलिसांची यंत्रणा डायल-112 ही यंत्रणा राज्यात नोव्हेंबर महिन्यात अव्वल आली. नियंत्रण कक्षामध्ये डिस्पॅचर यंत्रणा स्वतंत्रपणे उभारण्यात आली आहे. त्यासाठी प्रशिक्षित पोलिस अधिकारी व अंमलदार तसेच तांत्रिक सहाय्यकरिता तंत्रज्ञानाची नेमणूक करण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांनी पोलिस मदतीसाठी डायल-112 वर केलेल्या कॉलला नव्या व आधुनिक सुविधेमुळे अतिशय कमी वेळात पोलिस मदत मिळविण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. त्यानुसार नोव्हेंबर 2024 मध्ये सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नागरिकांना पोलिस प्रतिसाद मदत पोहोचवण्यात प्रथम क्रमांकावर आले आहे. नागरिकांना पोलीस मदत पोचविण्याचा सरासरी वेळ 37 सेकंद असा आला आहे.

## संपादकीय

# उपराष्ट्रपतींवरची नामुष्की

संसदीय कामकाजातील कटुतेने आज नवीन कळसाध्याय गाठला आहे. राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असलेले उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या विरोधात विरोधी पक्षीयांनी अविश्वासाचा ठराव मांडला आहे. उपराष्ट्रपतींवर म्हणजेच राज्यसभेच्या विद्यमान अध्यक्षांवर अशा स्वरूपाचा ठराव येण्याची भारतीय संसदेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे.उपराष्ट्रपतिपदाच्या खुर्चीसाठी ही नामुष्कीच आहे. हा अविश्वास ठराव संमत होईल की नाही, हा मुद्दा नंतरचा, पण मुळात असा ठराव येण्याची वेळच धनखड यांनी का येऊ दिली यावर अधिक विचार होणे गरजेचे आहे. धनखड उपराष्ट्रपती झाल्यापासून त्यांनी राज्यसभेत विरोधकांची पद्धतशीर कोंडी करून त्यांची सतत मुस्कटदाबी केली असा त्यांच्यावरचा आरोप आहे.

जो कोणी दूरदर्शनवरील राज्यसभेचे कामकाज पाहतो, त्याच्या नजरेला ही बाब सहजपणे येऊ शकते. विरोधकांचे माइक बंद करणे, विरोधकांचे नेते बोलत असताना सतत स्वतःच त्यात अडथळे आणणे, अनेक वेळेला त्यांना बोलण्याची परवानगीच नाकारणे, त्यांनी दाखल केलेले तहकुबी प्रस्ताव सरसकट फेटाळणे आणि सरसकट विरोधी पक्षांच्या सभासदांना निलंबित करणे असे प्रकार धनखड यांच्याकडून वारंवार झाले आहेत. अगदी कालचीच गोष्ट सांगायची तर भाजपचे नेते जे. पी. नड्डा यांनी सोरोस प्रकरणावरून काल राज्यसभेत भाषण केले. त्यांना 13 मिनिटे धनखड यांनी विनाअडथळा बोलू दिले, पण त्याच्या उत्तरात उभे राहिलेले मल्लिकार्जुन खर्गे यांना एक मिनिटही नीट बोलता आले नाही, त्यांचा माइक लगेच बंद केला गेला अशी त्यांची तक्रार आहे. राज्यसभेच्या कामकाजाचे जे प्रसारण होते ते पाहिल्यानंतर असे दिसून येते की धनखड यांनी विरोधकांना मनमोकळेपणाने मते मांडू द्यायला कधीच अनुमती दिली नाही. विरोधकांकडून आरोप झाल्यानंतर त्यात सरकारकडून हस्तक्षेप किंवा आक्षेप होण्याआधी, धनखड हेच विरोधी सदस्यांना कायम दटावत असल्याचा पाहायला मिळाले आहे. विरोधकांनी कुठलाही मुद्दा मांडल्यानंतर, तुमच्याकडे काय पुरावा आहे, अशी विचारणा धनकड सातत्याने करीत राहिले आहेत. हा प्रकार एक दोन महिने नव्हे तर त्यांच्याकडून सुरुवातीपासून सुरू आहे. विरोधकांच्या म्हणण्याच्या नोंदी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याचा सपाटाच त्यांनी लावला होता. कामकाजाच्या वेळी अमुक एखादा मुद्दा रेकार्डवर घेऊ नका असे सांगण्याचा राज्यसभा अध्यक्षांना अधिकार असतो, पण कामकाज संपल्यानंतरही या नोंदी परस्पर गाळल्या गेल्याची विरोधकांची तक्रार आहे.

त्याबाबत विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून अध्यक्षांच्या विरोधात स्पष्टपणे नाराजी नोंदवली गेली आहे, पण त्याची धनखड यांनी कधीच फिकीर केलेली दिसली नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर आम्हाला जड मनाने हा अविश्वास प्रस्ताव आणावा लागत असल्याची भूमिका काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी आज स्पष्ट केली आहे. दीर्घकाळच्या संसदीय कारकिर्दीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून कायमच उच्च संसदीय प्रथांचे पालन केले जाते. 'सदन की गरिमा' असा शब्दप्रयोग संसदीय कामकाजात नेहमी ऐकायला मिळतो. संसद की गरिमा, म्हणजे संसदेची प्रतिष्ठा आणि गौरव कायम राखण्याला दोन्ही बाजूंनी सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित असते. त्यामुळेच धनखड यांच्या सततच्या पक्षपाती भूमिकेवर आतापर्यंत विरोधी पक्षाने अविश्वास प्रस्तावाचे हत्यार थेट उपसले नव्हते.

पण पाणी डोक्यावरून जात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांनाही हा शेवटचा उपाय करावा लागला आहे. राज्यसभेचे संख्याबळ 245 इतके आहे. सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे 121 सदस्य आहेत. बहुमतासाठी त्यांना केवळ दोन सदस्य कमी असले तरी, ही कमी ते अन्य पक्षांच्या मदतीने सहज भरून काढू शकतात. त्यामुळे विरोधकांनी आणलेला हा अविश्वास प्रस्ताव संख्याबळाच्या आधारे फेटाळणे भाजपला अवघड नाही. पण असा प्रस्ताव दाखल होणे आणि त्यावर सभागृहात चर्चा होणे यातून राज्यसभा अध्यक्षपदची शान कमी होणार आहे, ही बाब ध्यानात घेणे गरजेचे आहे.

धनखड हे उपराष्ट्रपती व राज्यसभेचे अध्यक्ष होण्यापूर्वी पश्चिम बंगालमध्ये राज्यपाल होते. तेथेही त्यांनी आपल्या पदाचा एकतर्फी वापर करून पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारला बेजार केले होते. त्याचीच बक्षिसी म्हणून त्यांना हे उपराष्ट्रपती पद दिले गेले अशी वदंता आहे. हा मुद्दा कितपत खरा याविषयी वाद होऊ शकतात, परंतु राज्यसभेत सत्ताधारी पक्षाकडे पाशवी बहुमत नाही, त्यामुळे तेथील दोलायमान परिस्थितीवर खमका अध्यक्ष असणे गरजेचे होते. ही सरकारची गरज भागवण्यासाठीच धनखड यांना या पदावर आणले गेले असावे असे म्हणण्यास खूप वाव आहे. धनखड यांनी त्या बरहुकूमच आपला कारभार चालू केला आहे.

राज्यसभेचा अध्यक्ष सरकारकडून नियुक्त होतो. त्यामुळे तो सत्ताधारी बाजूकडेच मनातून झुकलेला असतो हे जरी गृहीत धरले, तरी प्रत्यक्ष राज्यसभेचे कामकाज चालवताना डोळ्यावर येईल इतका पक्षपातीपणा कोणीही टाळलाच असता. धनखड यांना ते भान राहिलेले दिसले नाही. एकुणातच विद्यमान सरकारकडून संसदेच्या कामकाजात जो मनमानीपणा सुरू आहे तो थक्क करणारा आहे. विरोधी पक्षांचे एकाच वेळी दीडशे सदस्य लोकसभेतून निलंबित करण्याचा प्रकार याच सरकारच्या काळात घडला होता. विरोधी पक्ष सदस्यांचे माइक बंद करण्याचा प्रकारही याच सरकारच्या काळात सातत्याने सुरू आहे. प्रमुख विरोधी पक्षनेत्यांच्या संसदेतील निवेदनाच्या नोंदी घाऊक स्वरूपात सभागृहाच्या कामकाजातून सर्रास काढून टाकल्या जातात. या सगळ्या प्रकारावर संसद सदस्यांनी कुठे दाद मागायची हा प्रश्न आहे.

संसदेतल्या कामकाजाविषयी सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येत नाही. संसदेचा पीठासीन अधिकारीसुद्धा त्यांना दाद देत नसेल, तर मग शेवटी संसदीय आयुध उगारावे लागते. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आता हे आयुध उगारले आहे. धनखड यांच्या विरोधात जो अविश्वास प्रस्ताव दाखल केला गेला आहे, त्यावर इंडिया आघाडीच्या तब्बल 60 खासदारांच्या सह्या आहेत. इतक्या मोठ्या सदस्यांचा अध्यक्ष धनखड यांच्यावर विश्वास नसणे हे त्यांच्यासाठी खचितच भूषणावह नाही.

संख्याबळाच्या आधारे हा अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाईल याची कल्पना असूनही हा प्रस्ताव दाखल करण्यामागे राज्यसभा अध्यक्षांना खजील करणे हा विरोधी पक्षांचा हेतू मात्र निश्चित साध्य होणार आहे. यातील दुसरी तांत्रिक बाब अशी की, या अविश्वास प्रस्तावावरील कामकाज पूर्ण होईपर्यंत धनखड यांना राज्यसभा अध्यक्ष पदावर बसून कामकाज चालवता येणार नाही. त्यामुळे धनखड यांची व्यवस्थित कोंडी करण्यात विरोधी पक्षांना यश आले आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब अशी की अविश्वास प्रस्ताव दाखल झालेले देशातले पहिले उपराष्ट्रपती अशी धनखड यांची नोंद संसदेच्या इतिहासात कायमस्वरूपी नोंदवली जाणार आहे.

# विद्यापीठातील १४.८२ कोटींचे पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे स्मारक अपूर्णच!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोर १४ कोटी ८२ लाख रुपये खर्च करून राजमाता अहिल्यादेवींचे भव्य स्मारक साकारले जात आहे. दोनदा मुदतवाढ दिल्यानंतर आता नवीन मुदत ३१ डिसेंबरपर्यंत आहे. तरीदेखील, स्मारकाचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. जानेवारीअखेर स्मारकाचे काम पूर्ण होईल, यासाठी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांचा पाठपुरावा सुरू आहे.

सोलापूर विद्यापीठाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ असे नामांतर झाले. त्यानंतर विद्यापीठात अहिल्यादेवींचे भव्य स्मारक उभारण्याची मागणी जोर धरू लागली. त्यानुसार राज्य शासनाने त्याला मंजुरी दिली आणि १४ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी दिला. तत्पूर्वी, २३ ऑगस्ट २०२१ रोजी स्मारक उभारणीसाठी समिती नेमण्याचा निर्णय झाला. त्यानंतर १७ फेब्रुवारी २०२३ रोजी स्मारक समिती स्थापन झाली आणि शासन आदेशानुसार पालकमंत्री या समितीचे अध्यक्ष झाले. त्यानंतर ३१ मे २०२३ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन झाले आणि स्मारकाच्या लोकार्पणासाठी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बोलावण्याचेही नियोजन ठरले होते. पण, वेळेत हे काम पूर्ण झाले नाही आणि लोकार्पण सोहळा लांबला. आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आगामी जयंतीपूर्वी स्मारकाचे काम पूर्ण होईल, याद्दष्टीने कुलगुरूंचे नियोजन आहे.



**स्मारकाची राहणार ही वैशिष्ट्ये...**

- विद्यापीठाच्या नव्या परीक्षा भवन व प्रशासकीय इमारतीसमोर हाती पिंड घेतलेला अहिल्यादेवींचा पूर्णाकृती पुतळा
- स्मारकाभोवती चौथरा, बारवाची ( अहिल्यादेवींनी बांधलेल्या विहिरीप्रमाणे ) उभारणी
- स्मारकाभोवती उभारल्या जाणाऱ्या शिल्पसृष्टीतून समजणार राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे समाजकार्य स्मारकाजवळ गार्डन, कारंजे उभारणी; स्मारक पाहायला येणाऱ्यांची असणार भव्य बैठक व्यवस्था.

मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर सोलापूर विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकामागे उभारला जाणार १५७ फुटाचा वॉच टॉवर ३००व्या जयंतीदिनीच स्मारकाचे लोकार्पण राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी ३००वी जयंती साजरी होत आहे. तत्पूर्वी, विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकाचे काम पूर्ण होणार आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक दिग्गजांना आणण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.

जानेवारीपर्यंत काम पूर्ण होईल विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे मोठे स्मारक उभारले जात आहे. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, बैठका देखील घेतल्या जात आहेत. कामासाठी डिसेंबरपर्यंत मुदत आहे, पण जानेवारीपर्यंत काम पूर्ण होईल.

**- डॉ. प्रकाश महानवर,** कुलगुरू,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

# डाक अदालतीचे 16 डिसेंबरला आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** टपाल खात्याच्या सेवेसंबंधीच्या तक्रारीचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी टपाल खाते नियमितपणे डाक अदालतीचे आयोजन करते.प्रवर अधिक्षक डाकघर सोलापुर यांच्या कार्यालयामध्ये 117 वी डाक अदालत दि.16. डिसेंबर 2024 रोजी सकाळी 11.30 वाजता आयोजित केली आहे.

पोस्टाची सेवा ही सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये अपरोक्षपणे पोस्टाच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करुन प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, संभाषणामध्ये/पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. ह्या तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवाडा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करतात.

पोस्टाच्या कार्यपध्दतीविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची या डाक अदालतीमध्ये दखल घेतली जाईल. विशेषतः टपाल स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, डाक वस्तू, पार्सल, बचत बँक तसेच मनिऑर्डरबाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. संबंधितानी डाक सेवेबाबतची आपली तक्रार श्री. के. नरेंदर बाबु, प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापुर विभागीय कार्यालय, सोलापुर - 413001 यांचे नावे दोन प्रतीसह दि. 12 डिसेंबर 2024 पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावीत. त्यानंतर आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. असेही डाकघर विभागाकडून कळविण्यात आले आहे.

## प्रबोधन

# स्वच्छतेने वाढे । देहाचे आरोग्य

'गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला' असं भजन म्हणणारे गाडगेबाबा! त्यांना खराट्याचे बादशहा ही पदवी आचार्य अत्रे यांनी दिली, ते गाडगेबाबांचं स्वच्छतेचं काम पाहून. पण भारतीय समाजाला त्यांचं भजनी स्वरूपच अधिक प्रिय असावं. कारण गाडगेबाबांच्या कीर्तनाला हजारोंच्या संख्येने हजर राहिल्यांपैकी कुणीही त्यांचा खराटा उचलला नाही, की त्यांचा स्वच्छता संप्रदायही पुढे चालवला नाही. त्यामुळे गाडगेबाबांपूर्वी समाजावर जसं अस्वच्छतेचं किळसवाणं साम्राज्य पसरलं होतं, ते त्यांच्या हयातीनंतरही सुरूच आहे. आज देशप्रेमाने अंध झालेल्यांना भारत Incredible India' अतुल्य भारत वाटत असेल; पण तो दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा आणि प्रामुख्याने अस्वच्छतेच्या बाबतीत मात्र जगात अतुलनीय आहे, यात शंका नाही. महात्मा गांधी म्हणत स्वच्छता म्हणजेच परमेश्वर! परमेश्वराचं अस्तित्व स्वच्छतेशिवाय संभवतच नाही. म्हणूनच गांधी जयंतीच्या कार्यक्रमात पूर्वी ग्रामसफाईचा उपक्रम शाळा- कॉलेजांकडून प्रथम राबवला जात असे. स्वच्छतागृहांची सफाई करण्याचं काम गांधीजी स्वतः करीत. एकदा ते काम नाकारल्यामुळे महात्माजींनी आपली पत्नी कस्तुरबांनाही खडसावयाला कमी केलं नव्हतं. महात्मा गांधींना देश स्वतंत्र करण्यासाठी खूप वेळ द्यावा लागला. पण त्यांचं व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होतं. देशाला त्यांनी जशी सर्वोच्च राजकीय संस्कृती दिली, तशीच ग्रामस्वच्छता आणि व्यक्तिगत स्वच्छतेद्वारे सामाजिक संस्कृतीची गुणवत्ता विकसित करण्यावरही त्यांनी भर दिला. पण त्यांच्यामागे त्यांनी जोपासलेली राजकीय संस्कृती विकृत झाली, तशी स्वच्छता संस्कृतीही लुप्त होऊन देखाव्यापुरतीच शिल्लक राहिली. मोहंजोदरोची प्राचीन संस्कृतीसुद्धा स्वच्छतेच्या मूल्याची जपणूक करणारी होती, हे आज उपलब्ध होणाऱ्या, नीटनेटकेपणाचं दर्शन घडवणाऱ्या अवशेषांतून स्पष्ट होतं. म्हणजे स्वच्छता संस्कृतीच्या बाबतीत आपली पुच्छप्रगती झाली, असं खेदाने म्हणावं लागतं.

महात्माजींचा संप्रदाय सेनापती बापटांनी पुढे चालवला. त्यांनी ग्रामस्वच्छता मोहीम सुरू केली. त्यांचा आदेश होता, रहा येथ तो गाव झाडा चला था। रहा जेथ तो देश झाडा चला या । चला या घाण काढा चला या । असे मार्ग हा भारता उद्धाराया ।। प्रत्येक गाव स्वच्छ झाला पाहिजे, तर देश स्वच्छ होईल आणि देश स्वच्छ झाल्याशिवाय सामाजिक जीवन निरोगी होणार नाही, असं ते तळमळून सांगत राहिले. स्वच्छतेमुळे मन निर्मळ होईल आणि मन निर्मळ झालं, की दुःख, शोक नाहीसे होतील, असा त्यांचा मूलभूत विचार होता. म्हणून ते म्हणतात, केरसुणी, खापर, खोरे । धन्य धन्य ती अवजारे । निर्मळतेचे सुख घ्यावे । हृदयाची उघडा दारे ॥ हृदय कपाटे लावून । घाण ठेविली साठवून । घाणीने हा हृदयरोग । शोकाचा तुम्हा भोग । शोकाने विव्हळ होता। दीन मीनसे तळमळता । शोकाचे कारण काय? शोधाया उघडा हृदय

साने गुरुजींना महात्मा गांधीजी, सेनापती बापट आणि गाडगेबाबांची स्वच्छता संस्कृती ही भारताच्या पारंपरिक आणि तथाकथित पांढरपेशा संस्कृतीपेक्षा लाख पटीने महत्त्वाची आणि विधायक वाटली. म्हणूनच त्यांनी झाडू संस्कृतीची स्तुती करून झाडणीला हात लावण्यात आपल्या बौद्धिक जीवनाचा अपमान मानणाऱ्यांना उपहासाने म्हटलं, 'लेखणीच्या लालित्यापेक्षा मला झाडूचं लालित्य प्रिय आहे.'

एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातील भारतातील शहरांचा व खेड्यांचा विकासदर तुलनेने अधिक आहे. पण हा देश अस्वच्छ म्हणून ओळखला जात असेल, तर तो विकासदर फसवा आहे, त्याला काही अर्थ नाही. वास्तविक, एखाद्या देशाची सामाजिक संस्कृती त्या देशाच्या अर्थसंस्कृतीबरोबरच विकसित न होणं, ही लाजिरवाणी बाब आहे. खरं तर, स्वच्छ राहाण्यासाठी फार पैसे लागत नाहीत; पण त्यासाठी तशा मानसिकतेची गरज मात्र आहे. हातात मोबाइल घेऊन उघड्यावर प्रातर्विधीला जाणाऱ्या महिलांना पुरेशा सोयी उपलब्ध करून देणं फारसं अवघड नाही. पण तसा आग्रह शहाण्यांनी धरण्याचं काम सातत्याने केलं पाहिजे. आज अनेक रोगांची राजधानी म्हणून आपला देश ओळखला जातो. ही ओळख शाळा-कॉलेजांतून स्वच्छता हे अतिमहत्त्वाचं जीवनमूल्य म्हणून शिकवलं गेलं, तरच पुसली जाईल. हॅरिस हे विचारवंत म्हणतात, 'जर भांडं स्वच्छ नसेल, तर त्यात काही ओतलं, तरी ते खराबच होणार!' भारतीय सनातन संस्कृती सोवळ्याचं ढोंग करते, चित्तशुद्धी, आत्मशुद्धीच्या गप्पा मारते, पण त्रिकालस्नानाचं नाटक करणाऱ्या कोणा शास्त्री - पंडिताने हातात झाडणी कधी घेतली आणि आपल्या हाताने आपलं अनेक दिवस न धुतलेलं सोवळंही कधी धुतलं नाही. धार्मिक संस्कृतीने सर्व समाजाला पारलौकिक जीवनाचं वेड लावल्यामुळे आपल्या खोलीची घाण शोधणं सोडून लोक नसलेलं ब्रह्म शोधत बसले. उकिरड्यावर बसून इंद्राच्या दरबारातील अप्सरांचं सौंदर्य कल्पनेत न्याहाळू लागले. 'चित्तशुद्धी हेच धमार्चं सर्वस्व आहे,' असा थोर विचार घोकणाऱ्यांना आता शरीरशुद्धी, गृहशुद्धी, ग्रामशुद्धी, नगरशुद्धी, जलस्रोतशुद्धी, भाषाशुद्धी, अर्थव्यवहारशुद्धी, वर्तनशुद्धी यासारख्या भौतिक, इहवादी पण अतिमहत्त्वाच्या विचारांचं पाठांतर दिलं, तरच देशाचं कल्याण होईल. कारण-

चित्तशुद्धीमागे । पंडिते लागली
उकिरडा झाली । खोली त्यांची ॥१
कुबट वासाने । घाणते सोवळे
लावती हे डोळे । खोट्या स्वर्गी ॥२
पंडितांनी लावले । लोकांना वेड
परलोक त्यांना । प्रिय वाटे ॥३
मंदिराभोवती । कचरा साठला
गाभाऱ्यात नेला । भक्ताने तो ॥४
कुजक्या कुंडात अळ्या, जंतू, किडे
भक्त पुण्य जोडे । स्नानाद्वारे ॥५
स्वच्छतेचे भान । भक्तांना असावे
कुणीही न व्हावे । अल्पायुषी ॥६
स्वच्छतेने वाढे । देहाचे आरोग्य
तोच खरा मार्ग । ध्यानी घ्या रे ॥७




**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071


# तपोरत्नं पुण्यस्मरण; नेताजी शिक्षण संस्थेत ४०२ जणांचा रक्तदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री ष.ब्र. तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित नीलम नगर येथील नेताजी शिक्षण संस्थेत आयोजित रक्तदान शिबिरात ४०२ रक्तदात्यानी रक्तदान करुन श्रद्धांजली अर्पण केले.निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात २१७ जणांनी तर विनायक नगर येथील राजराजेश्वरी शिक्षण संकुलात १८५ जणांनी रक्तदान केले.



निलम नगर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन सोलापूर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ वाय.एच.पाल्लोलू यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्राचार्य विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार, अक्षय ब्लड बँकेचे संचालक अजय रुपनर, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार,पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदानासाठी पालकांचे उत्स्फूर्त प्रतिसाद लाभले. संस्थेच्यावतीने सर्व रक्तदात्यांना भेट वस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर षडाक्षरी हिरेमठ यांनी आभार मानले. अक्षय ब्लड बँकेने रक्त संकलन केले.

विनायक नगर येथे राजराजेश्वरी प्राथमिक शाळा व माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन सेवानिवृत्त मुख्याध्यापक रेवणसिद्ध रोडगीकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशुले, धर्मराज बळ्ळारी, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन शितल पाटील यांनी केले. अश्विनी ब्लड बँकेने रक्त संकलन केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी दोन्ही शिक्षण संकुलातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

सर्व रक्तदात्यांनी पूज्य महास्वामीजींच्या चरणी सेवा रुजू केल्याने संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी आभार मानले.

# माढा सुधारित पाणीपुरवठा योजनेस मान्यता द्यावी

**माढा (कटूसत्य वृत्त):-** शहराच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नगर परिषद प्रशासन संचालनालयास दिल्या असल्याचे दादासाहेब साठे यांनी सांगितले. या सुधारित योजनेमुळे पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होणार आहे.माढ्याच्या उपमुख्यमंत्री पवार यांची मुंबईत दादासाहेब साठे यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी माढा शहराच्या सुधारित पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता मिळावी, अशी मागणी केली. पाणीपुरवठा योजनेची सद्यः परिस्थिती सांगून नगरपंचायतीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत माढा नगरपंचायतीचा ५२ कोटी ७२ लाख रुपये रकमेचा सुधारित पाणीपुरवठा योजना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचना प्रकल्प तयार केला आहे. सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेऊन प्रशासकीय मान्यतेसाठी सदर प्रस्ताव नगर परिषद प्रशासनाकडे दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले. ही योजना ग्रामपंचायतकालीन असून ३० वर्षे जुनी झाली आहे. सर्व पाइपलाइन जीर्ण झाले आहेत. यावेळी पवार यांनी नगर परिषद प्रशासन संचालनालयास फोनवरून या प्रस्तावास तत्काळ प्रशासकीय मान्यता देणेकामी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. माढा शहराची पाणीपुरवठा योजना आष्टी (ता. मोहोळ) येथील तलावावर राबविण्यात आली आहे. त्यामुळे वारंवार गळती होऊन शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याने शहरासाठी सुधारित पाणीपुरवठा योजना राबविणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन नव्या योजनेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या सुधारित योजनेस मंजुरी मिळाल्यास माढा शहराच्या पाणीपुरवठ्याची समस्या सूटणार आहे.



## वात्रटिका

### आता देवा पाव

लाडकी बहिण जशी
अधांतरी तसा भाऊ...
पाव की रे 'देवा' असे
विनवणी करतो भाऊ...
साधला मोका गरज सरली
भाऊ बहिणीचा विसर पडला...
आता केवळ खुर्ची आणि सत्ता
यावरच जीव जडला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566


पान १ वरून


# प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत ॲग्रिस्टॅक योजनेची...

व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व तो सातत्याने अद्यावत करणे या बाबी अंतर्भूत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांनी या ॲग्रीस्टॅक योजनेची प्रथम स्वतः सविस्तर माहिती घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत या योजनेची प्रचार प्रसिद्धी करावी. जेणे करून प्रत्यक्ष योजना सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून आवश्यक असलेली माहिती जलद गतीने प्रशासनाला उपलब्ध होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केले. तसेच या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून त्याकरता त्यांचे सर्व डिटेल्स घेण्यात येणार आहे, असे ही त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाची ही ॲग्री स्टॅक योजना एक पथ पथदर्शक प्रकल्प म्हणून बीड जिल्ह्यात यापूर्वीच राबविण्यास सुरुवात झालेली आहे. ही योजना केंद्र शासनाची महत्त्वपूर्ण योजना असून राज्य शासनाने ही योजना राज्यात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात बाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत कार्यक्षमपणे पार पाडून कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी व्हावा यासाठी आवश्यक असलेली माहिती अत्यंत बिनचूकपणे शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ॲप मध्ये भरावी असे निर्देश ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. ही योजना संपूर्ण राज्यात 16 डिसेंबर 2024 पासून मिशन मोडवर सुरू होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी ॲग्री स्टॅग या योजनेविषयी माहिती दिली. त्यानंतर बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ॲग्रीस्टॅक योजना बीड जिल्ह्यात कशा पद्धतीने राबविण्यात आली. तसेच ही योजना काय आहे व प्रत्यक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये कशा पद्धतीने कामकाज करावयाचे आहे याविषयीची अत्यंत सविस्तर माहिती ऑनलाईनद्वारे दिली.

या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी हे दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.


हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# थेऊर आरोग्य उपकेंद्र मार्फत हत्तीरोग दूर करण्या साठी सर्वेक्षण



**थेऊर (कटूसत्य वृत्त):-** थेऊर गाव परिसरातील तसेच वाड्या वस्त्यांवर प्राथमिक आरोग्य केंद्र कुंजीर वाडी अंतर्गत थेऊर आरोग्य केंद्रामार्फत हत्तीरोग सर्वेक्षण मोहीम दिनांक 9 डिसेंबर ते 14 डिसेंबर रात्री आठ ते बारा वाजेपर्यंत रक्त नमुने संकलित करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे, या मोहिमेत 20 वयापेक्षा जास्त वयोगटातील नागरिकांची रक्त संकलनाचे नमुने गोळा करण्यात येणार असून दैनंदिन 50 नागरिकांचे रक्त नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठवण्यात आले आहेत

हत्तीरोग हा क्युलेक्स डासांपासून होणारा संक्रमण आजार असून,हा आजार (फायलेरिय) या नावाने ओळखला जातो, फायलेरिय डासांची उत्पत्ती गटारे, सांडपाणी, घाण पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात होते.

दूषित डासांची मादी मनुष्याला चावते व त्वचेवर हत्तीरोगाचे जंतू सोडतो हे जंतू त्वचेतून मानवी शरीरात प्रवेश करतात व लसिका ग्रंथी मध्ये स्थिरावतात. जंतूचा शरीरातील प्रवेश आणि आजाराची लक्षणे दिसण्याचा कालावधी हा दहा ते बारा वर्षे असतो. सदर कालावधीत रक्ताची तपासणी केली नाही व औषधोपचार केला नाही तर शरीरात जंतूंची वाढ होऊन हाता पायावर सूज येणे व अंड वृद्धी होणे इत्यादी लक्षणे दिसून येतात.

आरोग्य कार्यालयाचे मा.जिल्हा आरोग्य अधिकारी पुणे, मा.जि हिवताप अधिकारी पुणे, यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली लोखंडे, डॉ. रूपाली भंगाळे, यांच्या सूचनेनुसार ही मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच हत्ती रोगाविषयी नागरिकांना आरोग्य माहिती देऊन जनजागृती करून रक्त नमुने संकलित करीत आहेत अशी माहिती थेऊर उपकेंद्राचे डॉ. शिल्पा दलाल यांनी दिली. या मोहिमेत आरोग्य सहाय्यक श्री बाळासाहेब मारणे, हिवताप कार्यालयाचे श्री डी.डी. कुंभार, एम. बी. पाटोळे, थेऊर आरोग्य केंद्राचे डॉ.शिल्पा दलाल, आरोग्य सेवक प्रशांत बिराजदार, सुनील वाघमारे, बाळू चोपडे, आरोग्य सेविका सुषमा काळभोर, आशाताई पुष्पा गायकवाड, निर्मला कांबळे, रूपाली गाडे, दिपाली सावंत, ज्योती टोम्पे इत्यादी सहभागी झाले.

# जिल्हा सरकारी वकील रजपूत पाकिट बुकचे प्रकाशन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आपले कर्तबगार जिल्हा सरकारी वकील प्रा. ॲड. प्रदीपसिंह राजपूत सर यांनी लिहिलेल्या राजपूत पॉकेट बुक (BNS, BNSS आणि BSA ) या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक सन्माननीय श्री अतुल कुलकर्णी, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे व इतर पदाधिकारी आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲंड गोवा चे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांच्या शुभहस्ते सोमवार दि. 09/12/2024 रोजी सोलापूर बार असोसिएशनच्या हॉलमध्ये मोठ्या उत्साहात करण्यात आले.

सुरुवातीस कार्यक्रमाची प्रस्तावना बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमित आळंगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोलीस अधीक्षक सन्माननीय श्री अतुल कुलकर्णी यांनी त्यांच्या मनोगतात रजपूत सरांनी लिहिलेल्या पुस्तकाचे कौतुक करून हे पुस्तक वकिलांनाच नाही तर पोलिसांना देखील अतिशय उपयुक्त असल्याचे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात बारचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. श्रीनिवास क्यातम, ॲड. एस. एस. सदाफुले, ॲड. गंगाधर रामपुरे, त्यांचे मनोगत व्यक्त करून प्रत्येक वकिलास हे पॉकेट बुक त्यांच्या दैनंदिन जीवनात अतिशय उपयुक्त होईल आणि राजपूत सरांनी हे पुस्तक मोफत दिल्यामुळे त्यांचे आभार देखील मानले. पुस्तकाचे लेखक ॲड. प्रदीप सिंह राजपूत सरांनी त्यांच्या या पुस्तकाची संकल्पना आणि हे पुस्तक लिहिण्याचा संपूर्ण प्रवास वर्णन केला. तसेच त्यांनी 100 जन्मठेप आणि दोन फाशी शिक्षा मिळवल्याबद्दल शंभर उपक्रम राबवण्याचा संकल्प करून त्या उपक्रमापैकी हा एक उपक्रम असल्याचे सांगितले.

सदर कार्यक्रमावेळी सोलापूर बार असो अध्यक्ष ॲड. अमित व्हि. आळंगे, उपाध्यक्ष- ॲड. व्ही. पी. शिंदे, सचिव ॲड. मनोज नागेश पामूल, सहसचिव ॲड. निदा सैफन, खजिनदार ॲड. विनयकुमार कटारे सह सोलापूर बार असोसिएशन बहुसंख्य विधिज्ञ उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव ॲड मनोज पामुल व आभार प्रदर्शन उपाध्यक्ष ॲड. निदा सैफन यांनी केले.

## जाहीर प्रसिद्धीकरण

अर्ज नं.५३८/२०२४

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

शाहनूर दादामिया इनामदार, वय-२९वर्षे,धंदा-मजुरी,रा.मोहोळ,ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

विरुध्द

नगरपरिषद मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार शाहनूर दादामिया इनामदार यांचा जन्म दि.१३/२/१९९५ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचे म्हणजेच शाहनूर दादामिया इनामदार यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.१३/२/१९९५ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे फेब्रुवारी १९९५ चे आभिलेखात अर्जदाराची म्हणजेच शाहनूर दादामिया इनामदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माचीनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१२/१/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३०दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता.१२/१२/२०२४

(शिक्का) हुकुमावरून/-सही तहसिलदार,मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.२०२४/कु.का.(जन्म नोंद) एस.आर.नं.:-२६०/२०२४

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात**

मोहन मल्हारी लोंढे, वय:६५,धंदा:शेती,रा.म्हैसगाव,ता.माढा,जि.सोलापूर. हल्ली रा.घर नं.४२३,गाव देवी वाडी,चर्च रोड,घणसोली,नवी मुंबई. } अर्जदार

विरुध्द

म्हैसगाव ग्रामपंचायत कार्यालय,म्हैसगाव, ता.माढा, जि.सोलापुर. } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार याने स्वत:चा नामे मोहन मल्हारी लोंढे यांचा जन्म दि.०५/०७/१९५९ रोजी म्हैसगाव,ता.माढा येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद म्हैसगाव ग्रामपंचायत कार्यालय, म्हैसगाव,येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी त्यांच्या स्वत: ची जन्मनोंद म्हैसगाव ग्रामपंचायत कार्यालय, म्हैसगाव येथील रजिस्टरला नोंदवुन तसा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. परंतु म्हैसगाव ग्रामपंचायत कार्यालय यांची स्थापना सन १९६९ रोजी झाली असलेमुळे म्हैसगाव ग्रामपंचायत कार्यालय यांनी तहसिल कार्यालय माढा यांच्याकडे अर्ज करा असे यातील अर्जदार यांना सांगितले.त्याअर्थी या जाहिरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्यांच्या नामे मोहन मल्हारी लोंढे यांचे जन्म घटनेची नोंद घरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख १७/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना त्यांचे मामा यांचे जन्म दि.०५/०७/१९५९ रोजीचे जन्म नोंद घरून तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल. तदनंतर काहीएक तक्रार चालणार नाही यांनी नोंद घ्यावी.ही नोटीस दि.१०/१२/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

(शिक्का) सही /- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा ता. माढा, जि. सोलापूर

# सोलापूरच्या गारमेंटचा युनिफॉर्म बेंगलोरात





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सात युनिफॉर्म गारमेंट फेअर यशस्वीरित्या राबविल्यानंतर आता पुन्हा सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशन च्या आठव्या फेअरचे आयोजन बेंगलोर येथे केले असून *याचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन तसेच सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असल्याचे फेअर चेअरमन सुनील मेंगजी यांनी सांगितले.

हा युनिफॉर्म गारमेंट फेअर 18 19 20 डिसेंबर 2024 ला बेंगलोर येथील श्रृंगार पॅलेस गार्डन पॅलेस ग्राउंड आठ नंबर गेटवर संपन्न होणार आहे अशी घोषणा असोशियन ने केलेली असल्याचे त्यांनी सांगितले.

या फेअर च्या माध्यमातून युनिफॉर्म सोर्सिंग प्लॅटफॉर्म फक्त सोलापूरच आहे किंवा वैश्विक संदेश देत असताना सोलापुरात फक्त युनिफॉर्म गारमेंट यशस्वीरित्या बनवू शकतो असा उद्देश असून ही माहिती यशस्वीरित्या सर्व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांना पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या युनिफॉर्म फेअर मध्ये एकाच छता खाली बाराशे ब्रँड व दहा हजार युनिफॉर्म डिझाइन्स पाहायला मिळतील याचा अर्थ शाळा कॉलेज हॉस्पिटल्स रेल्वे आणि कार्पोरेट सेक्टर ना ही एक युनिफॉर्म चे मेजवानीच ठरेल याबाबत कोणतीही शंका नाही.

सोलापूर जिल्ह्यात सक्षम आणि यशस्वीरित्या युनिफॉर्म गारमेंट कारखाने चालविणारे उद्योजक आहेत. विशेष आणि दजेर्दार मशिनरी द्वारा व कुशल कारागीर द्वारा या युनिफॉर्म गारमेंट चे उत्पादन होते.

देशातीलच नव्हे तर जगातील एकमेव युनिफॉर्म सोर्सिंग हब बनण्याच्या उद्देशाने सोलापूर आपले लक्ष निर्धारित करीत असल्याचे सुनील मेंगजी यांनी सांगितले आहे कारण उत्कृष्ट डिझाइन्स चांगले दजेर्दार कापड व कुशल कामगारांच्या हस्ते ही युनिफॉर्म बनविले जाते आणि ती कमीत कमी खर्चात उपलब्ध करून दिली जाते त्यामुळे सर्व जगाचे लक्ष युनिफॉर्म गारमेंट करिता सोलापूरकडे लागले असल्याचे त्यांनी सांगितले.

18, 19, 20 डिसेंबर 2024 या तीन दिवसात श्रृंगार पॅलेस ग्राउंड जया महल गेट नंबर आठ येथे संपन्न होणाऱ्या प्रदर्शनास बेंगलोर शहर व जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, उद्योजक आणि कार्पोरेट क्षेत्रातील ग्राहकांनी आवर्जून उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर या युनिफॉर्म प्रदर्शनाचे नाव झालेले आहे कारण इकडे कमीत कमी दरात दजेर्दार कापड घेऊन युनिफॉर्म बनविले जाते जास्त करून स्कूल युनिफॉर्म, कॉलेज युनिफॉर्म, हॉस्पिटल युनिफॉर्म, कार्पोरेट युनिफॉर्म, रेल्वे युनिफॉर्म, असे विविध नामवंत संस्थांची कामे या प्रदर्शनाच्या माध्यमातून सोलापूरचे उद्योजक केलेले आहेत.

आता पर्यंत संपन्न झालेल्या प्रदर्शनाला केनिया, जॉर्डन श्रीलंका थायलंड अशा विविध देशातील उद्योजकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन युनिफॉर्म चे काम करून घेतलेले आहेत. अशा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनास भेट देण्यासाठी बेंगलोर करांनी आवश्यक यावे असे आवाहन असोशियनच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## जाहीर प्रसिद्धीकरण

अर्ज नं.५३७/२०२४

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

संजय नारायण माने, वय-५९वर्षे,धंदा-मजुरी,रा.मोहोळ,ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

विरुध्द

नगरपरिषद मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची आई यांचा मृत्यू दि.१२/७/२०१५ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची आई म्हणजेच शकुंतला नारायन माने यांच्या मृत्यूबाबत सामनेवाला यांच्याकडे मृत्यू दाखल्याची ता.१२/७/२०१५ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै २०१५ चे आभिलेखात अर्जदाराची आई म्हणजेच शकुंतला नारायन माने यांची मृत्यूनोंद नसल्या बाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूचीनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१२/१/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.१२/१२/२०२४

(शिक्का) हुकुमावरून/-सही तहसिलदार,मोहोळ

## जाहीर प्रसिद्धीकरण

अर्ज नं.५३९/२०२४

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

शाहनूर दादामिया इनामदार, वय-२९वर्षे,धंदा-मजुरी,रा.मोहोळ,ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

विरुध्द

नगरपरिषद मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचा भाऊ नूरपाशा दादाभाई इनामदार यांचा जन्म दि.१३/७/१९९१ रोजी मौजे मोहोळ,ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचे भाऊ म्हणजेच नूरपाशा दादाभाई इनामदार यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.१३/७/१९९१ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै १९९१ चे आभिलेखात अर्जदाराचे भाऊ म्हणजेच नूरपाशा दादाभाई इनामदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माचीनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१२/१/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत मे कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.१२/१२/२०२४

(शिक्का) हुकुमावरून/-सही तहसिलदार,मोहोळ

## अनगर नगरपंचायत, अनगर,

ता.मोहोळ, जि.सोलापूर पिन-४१३२१४

स्थापना - ०१/११/२०२१

दुरध्वनी क्रमांक : ०२१८९-२४८५२३ Email ID: comcangar7@gmail.com

क्र.२०२४/बांधकाम/कावि/ १८३ दिनांक १२/१२/२०२४

### जाहिर आवाहन

अनगर नगरपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करणेत येते की, मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ७१ / २०१३ व अवमान याचिका ६ / २०१९ मधील निर्देशानुसार अनगर नगरपंचायत हद्दीतील, नगरपंचायत अखत्यारितील / मालकीचे मुख्य रस्ते व इतर रस्ते यावरील खड्डे, मनहोल्स व रस्ते खोदाई बाबतची तक्रारी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचे मार्फत विकसीत करणेत आलेल्या https://mahaulb.in या Integraged Web Based Portal (IWBP) प्रणाली वरील तक्रार मोडयुलचा वापर करुन फोटोसर तक्रार नोंदविण्यासाठी अनगर नगरपंचायत ई - मेल आयडी :- comcangar7@gmail.com व ऑफीस लँडलाईन क्र. (टोल फ्री क्रमांक) ०२१८९-२४८५२३ याद्वारे अनगर नगरपंचायतकडे तक्रार दाखल करता येईल.

सही/-
(सुरेश भदर)
मुख्याधिकारी
अनगर नगरपंचायत, अनगर

# सेना दलात अधिकारी पदाचे मोफत पूर्व प्रशिक्षण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (Service Selection Board) या परीक्षेची पूर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे मोफत प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण आधिकारी सोलापूर यांनी केले आहे.


शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी दिनांक 30 डिसेंबर 2024 ते 08 जानेवारी 2025 या कालावधित SSB कोर्स क्र.60 आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाणार आहे.

सोलापूर जिल्हयातील इच्छूक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दि. 02 जानेवारी 2025 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी डिपार्टमेंट ऑफ सैनिक वेल्फेअर, पुणे (DSW) यांच्या वेबसाईट वर सर्च करून त्यामधील रस्इ-60 कोर्स साठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.

एसएसबी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी पुढीलप्रमाणे नमूद कोणतीही एक पात्रता असणेआवश्यक आहे. त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना घेवून यावे. प्रशिक्षणार्थी कम्बाईड डिफेन्स सव्हीर्सेस एक्झामिनेशन (CDSE-UPSE) अथवा नॅशनल डिफेन्स केडमी एक्झामिनेशन (NDA-UPSE) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. व त्यासाठी एनसीसी C सर्टिफिकेट A किंवा B ग्रेड मध्ये पास झालेली असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्निकल ग्रॅज्यूएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापिठ प्रवेश प्रणाली (युनिव्हसिटी इनट्री स्कीम) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी छात्र प्रशिक्षण केंद्र नाशिक रोड नाशिक यांचा ई मेल आडी training.pctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. 0253-2451032 किंवा व्हाटसअप क्र. 9156073306 वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. ११२



**उभे शब्द :** १) भागाकारच्या विरूध्दार्थी शब्द २) तलाव, पाण्याचा साठा असलेली जंगलातील जागा ३) वाईट, डावा ४) मनातील उत्साह ५) दात घासण्यासाठी वापरतात ती एक प्रख्यात टूथपेस्ट ६) पतीची आई ८) एक श्वसनरोग १३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनला आहे १५) मोठा तीळ १६) भाजप पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आडनाव १७) सल उलट लिहा १८) मुलाची मुलगी २०) फोटो (हिंदीत) २१) पुण्यच्या विरूध्दार्थी शब्द २३) पाणी पिण्याची तीव्र इच्छा २४) महाराष्ट्रातील लेण्यांसाठी प्रसिध्द असलेला जिल्हा २६) फळातील गोड द्रव २७) आईची बहीण २८) एक थोर संत ३०) स्वार्थ, हेतू ३२) मदनाची पत्नी ३३) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक ३५) देवतांनी दिलेला आशीर्वाद ३५) मानहानी करणे ३८) व्यायाम, मेहनत ४१) न बोलण्याचे घेतलेले व्रत ४२) पुरूषांच्या ओठावरील केस

**आडवे शब्द :** १) मराठी वर्षाच्या सुरूवातीचा येणारा सण ४) मराठी वर्षातील सुरूवातीचा महिना ५) हा उगळावा तितका काळाच, अशी एक म्हण आहे ७) सहाय्य ९) सब्र का ** मिठा होता है १०) पाठीवर कठीण आवरण असलेला एक उभयचर जीव ११) कबूल, ** असणे १२) खेळ (इंग्रजीत) १४) पक्का, न बदलणारा निर्णय या अर्थाने १६) छ. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांचे माहेर १९) तीन आणि चार मिळून होणारी संख्या २१) हरिणाचे पिल्लू २२) पानाचा विडा याच्यामुळे रंगतो २४) शेतीची नांगर, पाभार ही अवजारे (ग्रामीण भाषेत) २५) जळण २८) सात गुणिले तीन २९) उलटी, ओकारी ३१) गाणे गाणारा ३२) रसाळ, रसयुक्त ३५) होडी, नौका ३५) एक म्हण-** तेथे माती ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) भीतीने थरथरणे, **** उडणे ४०) एसटीची प्रवासी गाडी ४२) गवंडीकाम वा इतर कामातील कुशल कारागीर ४३) ध्येय साध्य करण्यासाठी या गोष्टी पणाला लावाव्या लागतात-** ** ** ४४) राष्ट्रवादीचे एक नेते-*** पवार

### शब्दकोडे क्र. १११ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | क्ष | य | कु | मा | र | | अ | भि | षे | क | |
| जि | | श | क | | हा | जी | र | | | पि | ळी |
| त | र | | र | पे | ट | | बा | य | ब | ल | |
| प | द | र | | टा | | आ | ज | | | दे | |
| वा | न | वा | | रा | स | | खा | स | | व | य |
| र | | न | थ | | व | त | न | दा | र | | व |
| | सु | गी | | व्हि | ल | न | | शि | का | य | त |
| सा | ग | | ग | ल | त | | पा | व | | | मा |
| ग | र | द | न | | | सा | य | | मं | ग | ळ |
| र | ण | | | स | रा | व | | गो | ड | | |
| | | प | र | त | | का | न | | प | र | वा |
| | स | र | ब | त | | श | र | द | | मा | स |


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**
उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
९४२२४६०३१९

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
संपर्कः
9881361260

**पाहिजेत**
फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.
संपर्कः
गणेश स्टील फॅब्रिकेशन
९९२२५२५२३७

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**

इंजिनिअर: इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याच्या युनिट 1 व 2 वजनकाट्यांची भरारी पथकाकडून तपासणी

## दोन्ही ठिकाणचे वजनकाटे अचूक असल्याचे निष्पन्न



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नंबर-1 व पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील युनिट नंबर -2 येथील वजनकाट्यांची वैधमापन विभागाच्या भरारी पथकाच्या अधिका-यानी अचानक तपासणी केली असता दोन्ही साखर कारखान्याचे सर्व ऊस वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे निष्पन्न झाले असून कारखान्याकडे गाळपास आलेल्या ऊसाचे वजन वजनकाट्यावर झाल्यानंतर लगेचच संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या मोबाईलवर ऊसाचे वजनाचा तातडीने मेसेज जात असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष माजी आ.बबनराव शिंदे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब येथील सन 2024-25 चा ऊस गाळप हंगाम जोमाने सुरू आहे. वैधमापनशास्त्र विभागाकडील शेजवळ, निरीक्षक वैधमापन शास्त्र (वजनमापे), वाघोली विभाग, जि.पुणे व अचूक निरिक्षक वैधमापन शास्त्र,पुणे विभाग क्र.2 यांचे भरारी पथकाने दि.05/12/2024 रोजी दुपारी 1 वा.चे सुमारास अचानक विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे पिंपळनेर युनिटला भेट देवून ऊस वजनकाट्यांची तपासणी केली.तसेच या पथकाने ऊस उत्पादकांचे ऊसाने भरलेल्या वाहनाचे कारखान्याचे ऊस वजन काट्यावर वजन केले असता कारखान्याचे वजन काट्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आली नसून वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे सिध्द झाले आहे. यावेळी वैधमापनशास्त्र विभागाचे पथकाने सर्वांचे समोर पंचनामा करून सर्व ऊस वजन काटे बरोबर असल्याचे अहवालात नमुद केले आहे.

तसेच उपनियंत्रक वैधमापनशास्त्र (वजनमापे) पुणे येथील ए.वाय.अभंगे, उपनियंत्रक, वैधमापनशास्त्र पुणे जिल्हा क्र.4, निरिक्षक वैधमापनशास्त्र पुणे क्र.5, निरिक्षक वैधमापन शास्त्र इंदापूर विभाग व निरिक्षक वैधमापन शास्त्र खेड विभाग प्र.रा. बागडे यांचे भरारी पथकाने दि.10/12/2024 रोजी सांयकाळी 5 वा. चे सुमारास अचानक विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे करकंब युनिटला भेट देवून ऊस वजनकाट्यांची तपासणी केली.तसेच या पथकाने ऊस उत्पादकांचे ऊसाने भरलेल्या वाहनाचे कारखान्याचे ऊस वजन काट्यावर वजन केले असता कारखान्याचे वजन काट्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आली नसून वजनकाटे योग्य व अचूक असल्याचे सिध्द झाले आहे. यावेळी वैधमापनशास्त्र विभागाचे पथकाने सर्वांचे समोर पंचनामा करून सर्व ऊस वजन काटे बरोबर असल्याचे अहवाल नमुद केले आहे.

सदरप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे, युनिट नं.2 चे जनरल मॅनेजर सुहास यादव, केन मॅनेजर संभाजी थिटे, इन्स्टुमेंट इंजिनिअर अजित माने, केनयार्ड सुपरवायझर नामदेव गायकवाड, युनिट नं.2 चे शेती अधिकारी रामचंद्र पाटील, बाबुराव इंगवले, इन्स्टुमेंट इंजिनिअर अतुल देवकर, ऊस पुरवठा अधिकारी गणेश खेडेकर, केनयार्ड सुपरवायझर महादेव गायकवाड, ऊस पुरवठादार शेतकरी, वाहनमालक, ट्रॅक्टर ड्रायव्हर, बैलगाडीवान उपस्थित होते.

# होटगीतील बृहन्मठात शुक्रवारपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी मठाचे तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्याराधानानिमित्त श्रीशैल, काशी व उज्जैन जगदगुरूंच्या दिव्य सान्निध्यात महास्वामीजींची समाधी शिलामंदिर लोकार्पण, मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहणाबरोबरच विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे क्रिया आयोजन करण्यात आल्याची माहिती काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवार, १३ ते २२ डिसेंबर या कालावधीत दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी येथील मठात संस्थेचे अध्यक्ष चन्नयोगि राजेंद्र शिवाचार्य स्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली सर्व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवार, १३ रोजी सकाळी सहा वाजता श्री जगदगुरू पंचाचार्य ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.रविवार, १५ डिसेंबर रोजी सकाळी सहा वाजता बाळीवेस येथील मठातून तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या शीला मूतीर्ची असंख्य भक्तांच्या उपस्थितीत सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. ही मिरवणूक श्री मल्लिकार्जुन मंदिर, मधला मारुती, आजोबा गणपती, गुरूभेट, सात रस्ता, मजरेवाडी, सिध्देश्वर सहकारी साखर कारखानामार्गे होटगी मठात पोहोचल्यानंतर सांगता होणार आहे. दुपारी चार वाजता नूतन मंदिरास शिखराभिषेक करण्यात येणार आहे. सोमवार, १६ डिसेंबर रोजी योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्या औचित्य साधून योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींची क्रिया समाधी शिला मंदिर लोकार्पण, मूर्ती प्राणप्रतिष्ठापना, कळसारोहण व धर्म सभेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्रीशैल जगद्गुरू डॉ. चन्नसिध्दाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, काशी जगदगुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, उज्जैन जगद्गुरू सिध्दलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी व काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते होणार आहे.या कार्यक्रमास महाराष्ट्र कर्नाटक व आंध्र प्रदेशातील अनेक मठांचे शिवाचार्य गण उपस्थित राहणार आहेत. याशिवाय माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,खा.प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, सुभाष देशमुख,देवेंद्र कोठे, राणाजगजितसिंह पाटील, दिलीप सोपल, प्रकाश हुक्कीरे (बेळगाव), वी. आर. पाटील (आळंद), माजी आ. सिध्दाराम म्हेत्रे, दिलीप माने,विश्वनाथ चाकोते, सिद्रामप्पा पाटील, शिवशरण पाटील, मधुकरराव चव्हाण, बसवराज पाटील, रविकांत पाटील, इराण्णा चरंतीमठ (बागलकोट), सुभाष गुत्तेदार, सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी, महेश कोठे, राजशेखर शिवदारे, सिध्दय्या स्वामी, अमर पाटील, इंदुमती अलगोंड-पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.होटगी येथे योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या पुण्याराधनानिमित्त तपोरत्न मंदिराच्या कळसारोहणाचा संपूर्ण खर्च होटगी गावातील सासरी गेलेल्या सर्व जाती-धमार्तील सुकन्या व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आल्याची माहिती निघणार आहे. पंचक्रोशीतील भक्तांनी या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस नागणसूर जगद्गुरूंच्या दिव्य सान्निध्यात गुरुवंदना शुक्रवार, २० डिसेंबर रोजी रात्री १०.१० वाजता श्रीशैल व काशी जगद्गुरूंच्या दिव्य सान्निध्यात तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींचा आत्मज्योत प्रज्वलन व गुरुवंदना कार्यक्रम होणार आहे. शनिवार, २१ रोजी सकाळी आठ वाजता आत्मज्योतीची मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर दुपारी धर्मसभा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, २२ रोजी पाळणा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, १३ ते १६ डिसेंबरपर्यंत दररोज सकाळी आठ वाजता श्री रुद्र होम हवन पूजा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. तसेच १३ ते १९ डिसेंबरपर्यंत दररोज सायंकाळी सात वाजता अमृतेश्वर शिवाचार्य स्वामीजी (जिंतूर) यांचे शिवकथा प्रवचन होणार आहे.श्रीशैल जगद्गुरूंची इष्टलिंग महापूजा तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापनानिमित्त मंगळवार, १७ ते २० डिसेंबरपर्यंत दररोज सकाळी आठ वाजता दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी

मठात श्रीशैल जगद्गुरूंची इष्टलिंग महापूजा भक्तिभावात संपन्न होणार आहे. या महापूजेत भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी यांनी दिली.महास्वामीजींच्या पुण्याराधना- निमित्त होटगी संस्थेच्या अक्कलकोट रोड, भवानी पेठ येथील शिक्षण संकुलात रक्तदान शिबिर व क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार,२० रोजी बोरामणी येथून सकाळी आठ वाजता पालखी सोहळा मठाचे श्रीकंठ शिवाचार्य स्वामीजी, शहापूर मठाचे सुगुरेश्वर स्वामीजी, संचालक प्रकाश जम्मा, शिवा नंद पाटील, शशिकांत रामपुरे, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, अमोगसिध्द कुंभार, यमुनाप्पा होटगोंड, शांतू स्वामी, संतोष हिरेमठ, हनुमंत पाटील, बसवेश्वर स्वामी आदी उपस्थित होते.

# विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने मानवी हक्क दिन साजरा



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निदेर्शानुसार व सलमान आझमी, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व सु.रा. मुलींची प्रशाला, सेवासदन सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला.

यावेळी काढण्यात आलेल्या फेरीत सेवासदन प्रशालेतुन सर्व विद्यार्थींनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. फेरी नवीवेस पोलीस चौकी, सरस्वती चौक मार्गे काढण्यात येवुन परत सेवासदन प्रशालेत समारोप करण्यात आले. फेरीमध्ये 'माझे हक्क, माझे भविष्य, आत्ताच' या २०२४ रोजी मानवाधिकार दिनानिमित्त थीम च्या घोषणा देण्यात आल्या.

याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. उमेश देवर्षी, लोकअभिरक्षक विधिज्ञ श्रीमती देवयाणी किणगी, सेवासदनशाळेचे उपमुख्याधिपीका नंदीनी बारभाई, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, तसेच शाळेतील मिरा केंद्रे, लक्ष्मी कमळे, जयश्री पवार व श्रुती मोहोळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ही रॅली/ कार्यकम यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.ए.जी. नदाफ, कर्मचारी प्रविण विभुते, रहिम शेख, व्ही.टी. शिंदे, शाहरूख पिंढारी इत्यांदींनी परिश्रिम घेतले.

# शिक्षक जिवंत शिल्पे घडविण्याचे देशोपयोगी काम करतात - माजी आ. सावंत

## राज्य कृती समितीच्या वतीने माढा व माळशिरस तालुक्यातील शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने नेहमीच चांगली कृती करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक व सन्मान केला आहे. शिक्षक हे जिवंत शिल्पे घडवण्याचे देशोपयोगी व समाजोपयोगी कार्य वर्षानुवर्षे करीत आहे त्यामुळे असे विधायक व रचनात्मक कार्य करणाऱ्या शिक्षकांना अधिक काम करण्याची ऊर्जा व प्रोत्साहन मिळावे याकरिता त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचे काम आम्ही मागील अनेक वषार्पासून करीत असल्याचे प्रतिपादन पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले आहे.

ते कोर्टी ता. पंढरपूर येथील सिंहगड कॉलेजमध्ये महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने माढा व माळशिरस तालुक्यातील 65 शिक्षकांना जिल्हास्तरीय कृतीशील शिक्षक पुरस्काराने सन्मानित करताना रविवारी 8 डिसेंबर रोजी बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.यू एफ जानराव होते.

प्रास्ताविकात कृती समितीचे समाधान गाडगे यांनी सांगितले की,मागील दहा ते बारा वर्षापासून हा विधायक व रचनात्मक उपक्रम राबवित आहोत.पुणे विभागातील पाच जिल्ह्यातील शेंकडों गुणवंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन्मानित करून त्यांच्या कायार्चा यथोचित गौरव केला आहे.

सूत्रसंचालन राजेंद्र आसबे यांनी केले. आभार आगतराव भोसले यांनी मानले.

यावेळी संस्थापक अमोल सुरवसे, शशिकला जगताप, नंदकुमार टोणपे, सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक बाळू गुंड, पूजा सुरवसे, संगीता देवकर, मेघना गुंड, उषा पाटील, महावीर आखाडे, सुधीर गुंड, रामचंद्र काटकर, अपूर्व सावंत, विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड, प्राचार्य सागर थोरात, हरिश्चंद्र इंगळे, मुख्याध्यापक मारुती ढगे, शंकर धावारे, गजानन जोकार, बंडू जाधव, शिवाजी नागणे, गजानन लावर हरिश्चंद्र गाडेकर, संतोष पाटील, समाधान दुधाळ, प्रियंका शिंदे, रमेश जाधव, ज्ञानेश्वर मस्के, नरसेश्वर पाटील, विनोद काळे, उल्हास सोनार, राजाराम देवकर, तुकाराम भाकरे, मारुती शिंदे, मेघश्री गुंड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने माढा व माळशिरस तालुक्यातील 65 जणांना जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यामध्ये दोन्ही तालुक्यातील कृतीशील शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, कृतिशील प्राचार्य, कृतिशील मुख्याध्यापक, कृतिशील शिक्षक व शिक्षिका, कृतीशील क्रीडाशिक्षक, कृतीशील ग्रंथपाल, कृतिशील लिपिक यांना पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व फेटा देऊन गौरवण्यात आले.

# 20 सप्टेंबरच्या 'त्या' जीआरच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस महाविद्यालयांकडून वेळकाढूपणा

## पात्र विद्यार्थ्यांना नाहक सहन करावा लागतोय आर्थिक भुर्दंड !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विमुक्त जाती व भटक्या जमाती,इतर मागासवर्ग अर्थात ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी संवगार्तून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने 20 सप्टेंबर 2024 रोजी एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे.ओबीसी,व्हीजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा प्रतिपूर्ती योजनेसाठी वार्षिक 8 लाख रुपये उत्पन्नाची मयार्दा रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे त्याऐवजी आता नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक केले आहे असे असतानाही काही महाविद्यालये या जीआर (परिपत्रका) प्रमाणे अंमलबजावणी करण्यास चालढकल व वेळकाढूपणा करीत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला आहे.अडीच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला आहे. तेंव्हा शासनाने याकडे लक्ष देऊन संबंधित महाविद्यालयांना त्या जीआर ची त्वरित अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी पालक व विद्यार्थ्यांमधून होत आहे.

यासंदर्भात बहुजन कल्याण विभागाने 20 सप्टेंबर 2024 रोजी काढलेल्या पत्रकानुसार ओबीसींची 8 लाख रुपये उत्पन्नाची मयार्दा रद्द करून नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आलं आहे.ज्या विद्यार्थ्यांकडे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र आहे त्यांना शिक्षण शुल्क तसेच परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू होईल. सध्या ज्या ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी पालकांचे उत्पन्न 8 लाख रुपयांपेक्षा अधिक आहे परंतु त्यांच्याकडे नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र आहे अशा मुलांना 50 टक्के तर मुलींना 100 टक्के शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत फायदा होणार आहे परंतु तो लाभ काही विद्यार्थ्यांना अद्यापही मिळाला नाही अशी खंत पालकांमधून व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा प्रतिपूर्ती योजनेसाठी सन 2017-18 पासून वार्षिक 8 लाख रुपये उत्पन्नाची मयार्दा होती त्यामुळे आठ लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ मिळत नव्हता.त्यांना पूर्ण शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क भरावे लागत होते.त्यामुळे उत्पन्नाची ही जाचक अट रद्द करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. त्याऐवजी नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र ग्राह्य धरावे अशीही मागणी पालकांमधून सातत्याने होत होती. त्यानुसारच आता हा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे.या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष-2024-25 पासूनच होणार असल्याचे जीआर मध्ये म्हटले आहे.तरी संबंधित सर्व महाविद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांना तातडीने लाभ मिळवून द्यावा अशी मागणी विद्यार्थी व पालकांमधून होत आहे.

याबाबत माहिती अशी की, राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित व शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व तंत्रनिकेतन महाविद्यालय, शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्त्वावरील निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवगार्तील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी महत्त्वाची असणारी उत्पन्न मयार्देची अट रद्द करण्यात आली आहे त्यामुळे या निर्णयाचा अनेक गरजू व पात्र विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे परंतु जीआर निघून अडीच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला आहे तरीही राज्यातील काही व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देणारी विशेषतः वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये प्रत्यक्ष अंमलबजावणीस टाळाटाळ करीत असल्याचे पालक व विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

# नातेपुते विकास आराखड्याच्या हरकतींचा सर्वांसमक्ष तोडगा काढावा



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते नगरपंचायत हद्दीमध्ये शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर शहराच्या प्रारूप विकास आराखड्याच्या अनुषंगाने टाकलेल्या आरक्षणाबाबत नगरवासियांकडून आलेल्या हरकतींचा नगरवासीय व लोकप्रतिनिधी या सर्वांसमक्ष तोडगा काढावा, अशी मागणी निवेदनाद्वारे सोलापूर येथील नगर रचना सहाय्यक संचालक कल्याण जाधव यांच्याकडे माळशिरस तालुका शिवसेना नेते राजकुमार हिवरकर पाटील यांनी केली आहे.

नातेपुते नगरपंचायत हद्दीत प्रारूप विकास आराखड्याचे आरक्षण टाकल्यामुळे काही कुटुंब भूमिहीन होणार आहेत. पिढीजात कसत असलेल्या जमिनी असून ग्रामपंचायत काळापासून यावर केलेली घरे, बांधकामे, दवाखाने यावरती आहेत. विकास नगररचनेच्या नकाशात दाखवलेले रस्ते यासह विविध प्रयोजने यामुळे नागरिकांच्या उदरनिवार्हाच्या जागा, घरे, शेतजमिनी, असलेली बांधकामे यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रारूप विकास आराखड्याच्या अनुषंगाने ११० हरकती नोंदविण्यात आल्या आहेत. नातेपुते नगरपंचायतीच्या हद्दीतील जवळपास २६ गटांचा आरक्षणाशी संबंध येत आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरपंचायतीला विकासासाठी निधी दिला आहे.

विकास कामाबरोबरच नागरिकांच्या उदरनिवार्हाच्या जागा, घरे, जमिनीच्या प्रश्नाबाबत नोंदविलेल्या हरकतीवर सुनावणी घ्यावी. सुनावणीस स्वतः उपस्थित राहून नगरवासीय व लोकप्रतिनिधी यांच्यासमोर तोडगा काढावा अशा मागणीचे निवेदन राजकुमार हिवरकर पाटील यांनी दिले आहे.

# निमगाव येथे शुक्रवारी आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा



**निमगाव (कटूसत्य वृत्त):-** निमगाव ता माळशिरस येथे आंबा उत्पादकांसाठी शुक्रवार दि 13 डिसेंबर 2024 रोजी निमगाव पिलीव रोड येथे निनाद पाटील यांच्या केशर आंबा बागेत आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा आयोजित केली असल्याची माहिती महादेश फार्मस फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सचिन नलावडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली

यावेळी बोलताना नलावडे म्हणाले की, माळशिरस तालुका कृषी विभाग व महादेश फार्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा सोलापूर आत्मा अंतर्गत आंबा उत्पादकांसाठी कार्यशाळा आयोजित केली असून या कार्यशाळेसाठी तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रुपनवर, कृशिभूषण आंबा उत्पादक शेतकरी डॉ. केशव सरगर, प्रभारी मंडळ अधिकारी सुरेश देवकाते, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा, माळशिरस कुलदीप ढेकळे हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार असून यामध्ये फळबाग लागवडीसाठी शासनाच्या विविध योजना, अतिसघन आंबा लागवड, आंबा लागवडीपासून छाटणी, विरळणी आणि जोपासना, आंबा संगोपन चतुसूत्री, मोहर संरक्षण आणि खत व्यवस्थापन, आंबा काढणे ते पिकविण्यासाठी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन, आंबा विक्री व्यवस्थापन प्रश्न उत्तरे आणि समाधान आदी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे

माळशिरस तालुक्यात दिवसेंदिवस आंबा लागवडीचे क्षेत्र वाढत असून शास्त्रोक्त पद्धतीने जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी तालुक्यासह आसपासच्या गावातील जास्तीत जास्त आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सदर आंबा कार्यशाळेत उपस्थित राहावे असे आवाहन महादेश फार्मस फाउंडेशन व तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे .

# निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या 'या' 23 कर्मचाऱ्यांविरूद्ध गुन्हा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने येथील धान्य गोदामात आयोजित केलेल्या प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या २३ अधिकारी, कर्मचाऱ्यांविरूद्ध शहर पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल झाला आहे. निवासी नायब तहसीदार बालाजी पुदलवाड यांनी यासंदर्भात फिर्याद दाखल केली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये येथील तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी शासकीय धान्य गोदामात निवडणूक विषयक प्रशिक्षण आयोजित केले होते. यासाठी नेमलेल्या विविध विभागांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी हजर राहणे क्रमप्राप्त असताना २३ जण गैरहजर राहिले होते. त्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावूनही खुलासा सादर केला नाही. त्यामुळे निवडणूक कामात अडथळा केल्याचा ठपका ठेऊन त्यांच्या विरूद्ध नायब तहसीलदार पुदलवाड यांनी फिर्याद दाखल केली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके करीत आहेत.

**गुन्हा दाखल झालेले कर्मचारी याप्रमाणे :**

मंगेश एस. शिंदे (वरिष्ठ सहाय्यक बी ॲन्ड सी), नागनाथ महाराज सोरेगांवकर (शिक्षक), उस्मान गुलाब तांबाकळी (क. लिपीक, सोलापूर मनपा), रामेश्वर पंडित सोलापुरे (सहा. शिक्षक), शहाबाज अमीनोद्दीन काझी (कला शिक्षक), अर्जुन मच्छिंद्र प्रक्षाळे (सहा. शिक्षक), सुरेश सिद्धाराम उतगीकर (सहा. शिक्षक), नामदेव मच्छिंद्र कुचेकर (सहा. शिक्षक), जी. एस. गोटे (क.लिपीक), प्रविण प्रभुलिंग शिरपनहळ्ळी (लिपीक), संतोषकुमार गंगाधर मंगुडे (सहा. शिक्षक), उदयकुमार मलसिद्ध उंबरजे (सहा. शिक्षक), उदयकुमार मलसिध्द उंबरजे (सहा. शिक्षक), मोहन अर्जुन आयवळे (सहा. शिक्षक), एम. अस्लम गुलामरसूल चंदा, विजयनाथ सिद्धरामप्पा हत्तुरे (मुख्याध्यापक), शिवानंद भिमशा बिराजदार (मुख्याध्यापक), पांडुरंग रानबा धेडे, खंडू बबन साळवे, गुरूनाथ पांडुरंग सुतार, मनोजकुमार महादेव वाल्हेकर, विजय दत्तात्रय गोडसे, लक्ष्मण भीमरा भोसले, विकास रावसाहेब साळुंखे यांचा समावेश आहे.

# पंढरपूरात आंतरराष्ट्रीय दत्तक जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महिला व बाल विकास विभागाच्या निदेर्शानुसार वा.बा. नवरंगे बालकाश्रम पंढरपूर या संस्थेने पंढरपूरात विविध ठिकाणी आंतरराष्ट्रीय दत्तक जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय पातळीवर नोव्हेंबर महिना "दत्तक महिना" म्हणुन साजरा केला जातो. याचे औचित्य साधून, वा. बा. नवरंगे बालकाश्रम या दत्तक संस्थेने पोस्टरव्दारे कायदेशीर दत्तक प्रक्रिया, सुरक्षित प्रक्रिया याबद्दल जनजागृती केली. पंढरपूर येथील हॉस्पीटल, रेल्वे स्टेशन, एस. टी. स्टॅन्ड आदी सार्वजनीक ठिकाणी तसेच पोलीस स्टेशन येथे जनजागृती माहिती फलक लावले. सदर संस्था गेली 149 वर्षे झाली मुलांचे दत्तक व पुनर्वसनचे काम करत आहे.कोणतेही बालक परस्पर दत्तक देणे व घेणे हा कायद्याने गुन्हा आहे यासाठी https://cara.wcd.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करावी व 1800111311 या हेल्पलाईनवर सकाळी 8.00 ते रात्री 8.00 वाजेपर्यंत पर्यंत माहिती घ्यावी. तसेच संस्थेत आल्यास सर्व माहिती देण्यात येईल अशी माहिती दिली. बेकायदेशीर दत्तक प्रक्रिया धोकादायक आहे, त्याला पुढे जाऊन अनेक अडचणी येतात, त्याकरीता केंद्राने निर्माण केलेल्या 'cara' या एजन्सीव्दारे आपले कायदेशीर दत्तक प्रक्रिया करावी असे आवाहन केले. तसेच या आंतरराष्ट्रीय दत्तक महिन्याचा उद्देश "Foster care and Foster care Adoption" या निमित्त बालगृहात प्रवेशित अनाथ, निराधार, निराश्रीत इत्यादी प्राधान्याने मोठ्या वयोगटातील बालकांना प्रतिपालकत्व या योजनेचा लाभ मिळवून देणे हा आहे. असे संस्थेच्या अधिक्षिका राजश्री गाडे यांनी यावेळी सांगितले. सदर माहिती फलक प्रदर्शन जनजागृती कार्यक्रमात संस्थेचे धर्मराज डफळे, सुचित्रा पवार, मीरा बडकस या सर्व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.